
# सेवक वार्ता

जून - २०२६

वर्ष - ७ अंक - ८

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र


## श्री. मोहन हरिभाऊ (एम.एच.) खेडकर, यांचे पुणे येथे निधन



दि. २४-०६-२०२६ रोजी माजी प्रधान मुख्य वन संरक्षक श्री. मोहन हरिभाऊ (एम. एच.) खेडकर, यांचे पुणे येथे वयाच्या ८७व्या वर्षी वार्धक्याने निधन झाले.

अंतिम दर्शनासाठी त्यांचा मृतदेह त्यांचे निवासस्थानी द्रुमदल, लकाकी रोड, मॉडेल कॉलनी, पुणे सकाळी साडे नऊ ते साडे अकरा वाजे दरम्यान ठेवण्यात आला होता.

त्यांचा अंत्यविधी दि. २५-०६-२०२६ रोजी पुण्याच्या वैकुंठ विद्युत दाहिनीत पार पडला. त्यावेळी सेवक संघाचे श्री. शिरीष अस्थाना, विठ्ठल पत्की, बडवे, वाय.जी. पाटील, आरगे, क्षीरसागर, ए. के. झा, व इतर अनेक सदस्य हजर होते. अंत्यविधी नंतर त्यांना काही वक्त्यांनी शब्द सुमने अर्पित केली. तत्पूर्वी वन विभागाच्या चमूने, निवासस्थानी जाऊन त्यांना शेवटची मानवंदना व पुष्पचक्र अर्पण केले. सुमारे शंभर चाहते वैकुंठात आले होते.

अत्यंत दुःखाने वन परीवार अशा व्यक्तिमत्त्वाला स्मरतो, ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य प्रामाणिकपणा, सदभवना आणि समाजसेवेसाठी समर्पित केले.

वृक्षारोपण, वंचित मुलांच्या शिक्षणासाठी कार्य आणि शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी योगदान हे त्यांच्या जीवनकार्याचे मुख्य ध्येय होते. समाजाला काहीतरी परत देण्याच्या त्यांच्या विचारांनी असंख्य लोकांच्या आयुष्यात कायमस्वरूपी बदल घडवून आणला.

त्यांच्या विनोदबुद्धीने आणि प्रत्येक समारंभात आनंदी वातावरण निर्माण करण्यांच्या स्वभावाने ते सर्वांच्या मनात विशेष स्थान करून गेले. कुटुंबीय आणि मित्र परिवारासाठी ते अत्यंत प्रिय होते, तर आपल्या नातवंडांसाठी ते खरे नायक आणि प्रेरणास्थान होते. आज ते आपल्यात नसले तरी त्यांनी जपानेली मूल्ये आणि त्यांनी स्पर्श केलेली माणासे त्यांच्या स्मृतींना सदैव जिवंत ठेवतील.

श्री खेडकर सर १९५९-६२ बॅचचे होते. ते डेहराडून येथे प्रशिक्षण. श्री ए जी रॅड्डी, श्री एस एस केळकर, श्री एम. एस. पारसनीस, श्री. व्ही. बी. जोशी हे त्यांचे बॅचमेट होते.

श्री. खेडकर हे प्रधान मुख्य वन संरक्षक या सर्वोच्च पदावरून दि. ३१-३-१९९९ रोजी सेवा निवृत्त झाले. आपल्या निष्कलंक, मैत्रीपूर्ण व तितक्याच प्रभावी सेवेतील लौकिकाची छाप सोडून गेले. त्यांच्यावर प्रेम करणारा मोठा वर्ग वन विभागात व वन विभागाबाहेर आजही आहे.

**It is difficult to reconcile to the loss of my mentor and guide. It was an honour to meet him for the first time at the Borivali national park. The event was the inauguration of the Log Hut. He was then DFO Shahapur. Thereafter he was my mentor even while I was at the Wildlife Institute of India, Dehradun. A wonderful generous officer who would lend a helping hand to all and sundry. His life was a great inspiration for me. He is now gone and I am out of station but his persona lives on. I pray for the bereaved family and for the soul of the great humanbeing.**

**V.B. Sawarkar, Director, WII, D-Dun**

***In the demise of M.H. Khedkar Sahib, we have lost one of the dozens of Indian Foresters. He was my MD FDCM, and I served under him as RM Nursery Unit.During that**

period it was great learning experience from Sahib both Officeand Field works. A practical Forester and excellent Team Leader. Parental Care on grooming young Officers. Where Sahib is there in social get together , there will be lots of jokes. Our family conveys our heartfelt condolence to the family members, relatives and host of friends the demise of him made a great loss. We pray his soul rest in peace in Heaven.

- K.SUBRAMANIAN & AMBUJAM

*It is a sad news hearing that N H Khedkar ex CCF Maharashtra died on 24.6.26. He was a nice gentleman and very good forester. I worked as DyCF Wadsa forest Division when he was CCF(PCCF ) Maharashtra forest Department.

-M. Karunakaran IFS Retd MH.

*सेवक संघाच्या पुण्यातील सर्व कार्यक्रमांना जातीने उपस्थित रहायचे आणि त्यामुळे त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा आपल्या सर्वांना लाभ होत असे. त्यांचं आपल्यातून जाणं इतकं अचानक झालं की विश्वास बसत नाही.

-एम. एम. कुलकर्णी, सेनि मु.व.सं.

*आदरणीय खेडकर साहेबांचे FDCM मधील योगदान कर्मचारी कधीच विसरू शकणार नाहीत.

- पी. के. कुलकर्णी, सेनि वि. व्य. FDCM

एक अभ्यासू व्यक्तिमत्व आज हरवले आहे. ते CCF ( Production) असतांना मला त्यांच्या हाताखाली काम करण्याची संधी मिळाली होती.

-बळवंत सेलुकर, सेनि वि.व.अ.

कै. खेडकर PCCF (निवृत्त) आता राहिलेले नाही हे जाणून मला खूप वाईट वाटले. ते M. D. FDCMLtd असताना मी त्यांच्या हाताखाली काही काळ D. M. (नियोजन) म्हणून काम केले. ते अतिशय सज्जन, त्यांच्या कनिष्ठ अधिकाऱ्याशी अतिशय सहकार्य करणारे होते.

पी. डी. मस्राम, सेनि विवअ

## सेवक सदस्य श्री. निकम यांचे धुळे ज्येष्ठ नागरिक संघात व्याख्यान .....

धुळे – जागतिक वसुंधरा दिनाच्या पूर्वसंध्येला धुळे शाखेचे जेष्ठत्तम सदस्य श्री. निंबा माणिकराव निकम, सेवानिवृत्त सहायक वन संरक्षक यांनी दि.४-६-२०२६ रोजी शिवतीर्थ ज्येष्ठ नागरिक संघात वसुंधरा दिनाचे महत्व व पर्यावरण संवर्धनाबद्दल खूपच चांगले मार्गदर्शन केले. त्याबद्दल ॲड.जे.टी.देसले अध्यक्ष शिवतीर्थ ज्येष्ठ नागरिक संघ यांनी त्यांचे आभार व्यक्त केले.







## बांबू लागवडीच्या मूल्यमापन कामाबाबत चाचपणी

नागपूर दि. २७-५-२६-श्री. बळवंत सेलुकर, सचिव, सेवक संघ, यांनी नागपूर येथील बांबू विकास मंडळाच्या (BDB) कार्यालयात कार्यरत, श्री. एस. व्ही. माडभूषी विवअ से नि यांच्याशी BDB अंतर्गत करण्यात आलेल्या बांबू लागवडीच्या मूल्यमापन करण्याच्या कामाबाबत चर्चा केली. त्यानुसार, या कामाबाबत BDB कडे औपचारिकरित्या प्रस्ताव विचारार्थ पाठवण्याबाबत सूचित केले.

श्री. सेलुकर, यांनी तसा प्रस्ताव BDB कडे यांनी पाठवला आहे.

## संघाच्या काही वैधानिक व संचालन पूर्ततेकामी लक्षवेध

१) सेवक संघात नवीन ट्रस्टींची नेमणूक आवश्यक आहे. महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट 1950 मधील कलम 22 प्रमाणे या बदलाची माहिती (change report) तीन महिन्याचे आत ज्या धर्मदाय आयुक्त / सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालयात सेवक संघाची नोंदणी झालेली आहे त्या पुणे कार्यालयास देणे आवश्यक आहे.

२) Executive body मधे जो बदल झालेला आहे त्याचा change report सुद्धा ज्या कार्यालयात सेवक संघाची नोंद झालेली आहे त्या पुणे कार्यालयात देणे आवश्यक आहे.

३) ही कार्यवाही इतरत्र होऊ शकत नाही कारण प्रत्येक जिल्ह्याचे कार्यक्षेत्र ठरलेले आहे .शिवाय सेवक संघाचा मूळ अभिलेख पुणे येथील कार्यालयात आहे.

४) ट्रस्टींचा मृत्यू झाल्यापासून तीन महिन्याच्या आत संबंधित कार्यालयास change report द्वारे कळविणे आवश्यक असते अन्यथा penalty लागू शकते.

५)सध्याचे Byelaws प्रमाणे वनविभागातील सेवानिवृत्त कर्मचारी अधिकारी कर्मचारी सेवक संघाचे सदस्य होऊ शकतात. वनविभागा व्यतिरिक्त इतर तज्ञ व्यक्ती सेवक संघाचे सदस्य होऊ शकतात काय. व याबद्दल प्रलंबित कार्यवाही : आमझरी येथे नुकत्याच झालेल्या AGM मधे असा ठराव घेण्यात आला की वने वन्यजीव पर्यावरण संवर्धन याविषयी आस्था असणाऱ्या वन विभागा बाहेरील व्यक्ती जर सेवक संघाच्या कामकाजात उपयुक्त ठरत असतील तर अशा तज्ञ व्यक्तींना सदस्यत्व देण्यात यावे. (ठराव क्रमांक ११) याबाबत byelaws मध्ये आवश्यक तो बदल करून वन विभागाबाहेरच्या तज्ञ व्यक्तींना सेवक संघाचे सदस्य होता येईल तसा चेंज रिपोर्ट द्यावा लागेल. ही तातडीची कार्यवाही करावी लागेल.

सेवक संघाच्या वेबसाईटवरील माहितीविषयी श्री सेलुकर यांनी वरील नोंदवलेली निरीक्षणे.

**आणि यावर श्री. पत्की जेष्ठत्तम सदस्यांचे मार्गदर्शन...**

१) Byelaws मराठीत उपलब्ध आहेत इंग्रजीत नाहीत.

२) Achievements (उद्दिष्टे) : इंग्रजीतील माहिती व मराठीतील माहिती यात फरक आढळतो

३) Financial Status: मराठीमध्ये ही माहिती उपलब्ध नाही.

एकंदरीत वेबसाईटवरील माहिती अद्यावत करणे आवश्यक..

**खालील गोष्टींची पूर्तता करणे आवश्यक आहे:**

१. अमरावती येथे तीन वर्षांपूर्वी आणि पुन्हा फेब्रुवारी २०२६ मध्ये अमझारी येथे झालेल्या कार्यकारी मंडळाच्या (Executive Body) बैठकींनंतरचा 'बदल अहवाल' (Change Report) अद्ययावत करणे.

२. उमेशने मला कळवले आहे की, चॅरिटी कमिशनरकडे लेखापरीक्षण अहवाल (audit report) सादर करताना, आमच्या जुन्या सनदी लेखापालांनी कार्यकारी मंडळाच्या काही सदस्यांच्या सह्या 'सेवक'चे विश्वस्त (Trustee) म्हणून घेतल्या होत्या. त्यांची ही कृती आणि मार्गदर्शन योग्य नव्हते. १९९७ मध्ये स्थापन झालेल्या 'सेवक'मध्ये ७ विश्वस्त होते आणि कायदेशीर तरतुदींनुसार, एखाद्या विश्वस्ताचा मृत्यू झाल्यास त्याबद्दलची माहिती ३ महिन्यांच्या आत चॅरिटी कमिशनरला देणे बंधनकारक असते. या तरतुदीबाबत आमच्या जुन्या सीएंकडे कदाचित पुरेशी माहिती नव्हती किंवा त्यांनी आम्हाला चुकीची माहिती दिली होती. ही माहिती मला माझे नातेवाईक आणि ज्येष्ठ सीए, शशांक पाटकी यांनी दिली. काही वर्षांपूर्वी श्री. अस्थाना यांची त्यांच्याशी एकदा भेट झाली होती. आम्हाला योग्य मार्गदर्शन करण्यासाठी शशांक यांना १९९७ मधील मूळ नोंदणीकृत दस्तऐवजाचा अभ्यास करायचा होता. उमेश किंवा आमचे सध्याचे सीए या बाबीकडे लक्ष देऊन पुढील कार्यवाही करू शकतात.

'सेवक'च्या पुणे स्थित नवीन कार्यकारी मंडळाच्या सदस्यांनाही मी विनंती करतो की, त्यांनी ही समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घ्यावा.

## राहिल्या त्या आठवणी.....

**जयप्रकाश आनंदराव पाटील, धुळे**

सहज आठवले जुनचे कॅलेंडर बघून.

पूर्वी सन १९९०-९२ पर्यन्त आम्ही जंगलात आजपासून (१ जून ) रोपे लावायला सुरुवात करायचो. त्याला ड्राय प्लँटींग Dry planting असे म्हणतात. याचे तंत्र असे होते की, ७ जून पासून मृग नक्षत्र सुरू होत असे. अनेकदा ७ जूनपूर्वी काहीं भागात विजा गडगडाट होऊन रोहिणी नक्षत्रात जोराचा पाऊस पडत असायचा. याचा हा फायदा घेणेसाठी ज्येष्ठ वन अधिकारी सल्ला देत असत आणि रोपे लावायाला लावत असत. याचे दोन फायदे वेगळे असत

(१) शेती पेरणी पूर्व कामे सुरू नसत म्हणूनच मजूर मुबलक मिळत असत.

(२) लांबवरच्या अवघड रोपवन जागी बिना अडथळा रोपे रोप वाटिकेतून आणून मजूर हसत खेळत रोपे लावत असत. दिवस मोठा येत असल्याने मजूर टंगळमंगळ करत नसत. काम जास्त होत असे. त्यामुळें रोपवाटिकेपासून लांबवरच्या साईट्स वरील कामे वेळेत होत असत.

या ड्राय प्लँटींगची पद्धत अशी होती की, रोपवाटिकेतून वाहतूक करावयाची रोपे सकाळीं ६ ते १० वाजेपर्यंत रोप वाटिकेत रोपांना पाणी मारून ट्रॅक्टर ट्रॉली भरून आणत असत. रोपे लागवडीस मजूरांना दिवस भर लागवड पुरेल या बेतानेच तेवढी रोपे मागवली जात असत. मोठ्या ड्रममध्ये १०० लिटर पाण्यात १ कि. ग्रॅ. हळद पावडर, कापूर १०० ग्राम, हिंग ५० ग्राम अश्या बेताने मिश्रण चांगले ढवळून त्यात लागवड पूर्वी पिशव्या बुडवून लागवड केली जात असे.

या मिश्रणाचा फायदा जरी मृग नक्षत्रात पाऊस उशिरा पडला तरी रोपे चांगल्या प्रकारे तग धरून असत. तजेलदार आणि टवटवीत असत.

माझे असे पण निरीक्षणात आले की, पाऊस जरी पडला नाही तरी रोहिणी नक्षत्रातील होणारी सूर्याची उन सावलीमुळे गवताचे बी पासून गवत उगवायला सुरू होत असे. म्हणून मी मे महिन्याच्या १५ तारखेपासून रोपवणातील गवत ओट्यावर गवत बी, हेमाटा बी बारीक वाळू मध्ये ५० ग्राम याप्रमाणे मिश्रण करून टाकत असू. गवत बी, हेमाटा पेरणीचे वेळेस मी स्वतः रोपवनात हजर रहात होतो. उन्हात. माझा वन रक्षक, मजूर यांचेवर विश्वास नसायचा. हे सर्व काम वाहणा-या वाराच्या वेग आणि गवत ओट्यांची दिशा यावर अवलंबून असे. एकदा पाउस पडून गेला अणि नंतर ओट्यावर बी पेरणी केली तर १० टक्के देखील पेरलेले बी उगवत नसे. त्याअगोदर स्थानिक गवते उगून जात असत. मग या बी पेरणीचा फायदा होत नसे. गवत बी पेरताना हातचे मुठीने मनगट कसे हलवायचे? आणि गवत बी पेरणी आणि

मिश्रण कसे करायचे , याचे प्रात्यक्षिक मी स्वतः करायचो. काही वेळा ५-१० गवत ओटे वर मी बी पेरायचो.त्यामुळे गार्ड साहेब, फॉरेस्टर साहेब याना देखील काटकोनात भु-मातेला ओणवे होऊन नमस्कार करावे लागत असे. त्या वेळी मजूर देखील फिदी फिदि हसत असत. खूप सुंदर आनंददायक दृश्य असायचे हे. माझे धुळे वन वृतातिल सहकारी ज्यांनी माझेबरोबर काम केलें आहे, ते देखिल सांगतील.

रोपवनात पडणारा पाऊस हा रोपांसाठी अमृत पाऊस असतो. रोपे लवकर स्थापित होतात आणि जोमदार पणे वाढायला सुरुवात होत असायची.

प्रयोग करून १००० रोपे लावून बघा. रोपवनात तरवड, रुई, बी टोचणी करुन बघा काहीं ठिकाणीं. काही ठिकाणीं जाळ्यामध्ये नीम , चंदन बी पेरणी करुन घ्या. रोपवनात साबर Euphorbia जिथे शक्य आहे, तिथे पावसापूर्वी लाऊन घ्या.

RFO हा नेहमीच प्रयोगशील आणि लीडर असावा लागतो. रोपवन लागवडडीचे वेळी हजर राहुन. वनअधिकारी सर्वं यांनी ग्रामीण, आदिवासीं यांचे बरोबर जंगलात समक्ष ऊभे रहा, तुमचे देखत काम करुन घ्या. तुम्हीही स्वतः करा. बघा तुम्ही तुमच्या चिंता, शरीर समस्या, घरातील समस्या सर्वं दूर होतील. हा आनंद फक्त वन रक्षक, वन पाल , वन क्षेत्रपाल यानाच मिळतो. वरचे ACF, DFO, DYCF, CF, CCF यांनीही घेउन बघावा. RFO जर क्षेत्रिय कामात रस घेणारा असला तर तो क्षेत्रिय प्रशासनात तो उत्कृष्ट ठरतो. He or She (RFO) should be the best fielder in all forestery operations. माझे सारखा ऑफिस मध्ये खुर्चीवर बसुन काळे कागद करुन गार्ड भेटला नाहि, फॉरेस्टर भेटला नाही असे लेखी काढण्यात धन्यता मानू नका. RFO ची रोपवने त्यांचे सारखी जोमदार, डौलदार, ताकदवान असली पाहिजेत.

आर.डी. पाटील से.नि. सहा.वन संरक्षक यांचे सारखी. यांनी केलेली रोपवने नवापूरला सुंदर आणि आजही जिवंत आहेत.

आमचे कडे खानदेशात म्हण आहे,

"घरमा जेठा बेटा, आनी, वावरमा आगात तोटा"

म्हणजे घरात ज्येष्ठ फळ मुलगा असावा आणि शेतात सर्वात अगोदर (आगाउ ) पेरणी केली तर त्याचा उपयोग चांगला होतो.

किती ज्येष्ठ मुले आई बापाला कामाला येतात हा आज चिंतेचा विषय आहे.

# वन सान्निध्याची साठी

विठ्ठल त्र्यंबक पत्की

## पदस्थापना -

पदविका प्रशिक्षण पूर्ण झाले नंतर माझी पदस्थापना परिविक्षाधीन सहाय्यक वनसंरक्षक, आलापल्ली वन विभाग, स्थित चंद्रपूर या पदावर झाली. ०८-०४-१९६७ रोजी मी या पदावर रूजू झालो. माझे विभागीय वन अधिकारी होते श्री. वसंत सरवटे साहेब. एप्रिलमधे ते रजेवर असल्याने, अतिरिक्त कार्यभार श्री. आर. जी. पटवर्धन, वि. व. अ. भामरागड यांचेकडे होता. त्यांना मानवंदना देऊन रुजू अहवाल दिला. मी पुण्याचा असून, ब्रीज खेळाची आवड आहे असे समजल्यावर त्यांनी मला बसवून घेत, रोठा सुपारी पातळ कातरून माझे हातावर ठेवली. सुपारी एवढी पातळ कातरली होती की ती जणू जिभेवर विरघळली.रेशन पेटी खरेदी करून,भरा आणि तीन

दिवसांचे आत आलापल्ली जा,अशा सूचना मिळाल्या. श्री. नामदेव बावणे मला शिपाई म्हणून मिळाला. सायंकाळी रेशन पेटी भरून तयार ठेवली आणि दुसरे दिवशी सायंकाळी ४ चे अहेरी बसने आलापल्लीस जाणेचे ठरविले.

## आलापल्ली व श्री नय्यर साहेब -

नेहमीच्या पुणेरी सवयीनुसार दुपारी ३.३० ला बस स्थानकावर पोहोचलो. तिथे चिटपाखरूं सुध्दा नव्हते. मी, नामदेव फक्त बसची वाट पहात कडूलिंबाच्या झाडाखाली गरम होत होतो. साडेचार वाजता चंद्रपूर-अहेरी लालपरी बस आली. बसचा पत्रा तापून गरम झाला होता. बसणारे आम्ही दोघेच होतो. अर्धा तासात प्रवासी संख्या १०-१२ झाली. बस निघाल्यावर आलेली वाऱ्याची गरम झुळूक सुध्दा सुखावह वाटू लागली. बस बल्लारशहाकडे आक्रमण करित होती. बल्लारशहास आणखी १०-१५ जण बसमधे चढले. कोठारी, झरण, विठ्ठलवाडी, मार्गे बस गोंडपिंपरीस येऊन थांबली. चहापानासाठी बस २० मिनीटे थांबेल अशी घोषणा कंडक्टरने केली. त्यावेळी गोंड पिंपरीत फक्त दोन हॉटेल होती. त्यातील एकात आम्ही दोघे बसलो. दोन आण्यात एक मोठा आलूबोंडा प्रत्येकी खाऊन, वर कडक मिठ्ठी चाय आम्ही चवीने पिऊ लागलो. उन्हाच्या झळा कमी झाल्याने, आणि तापमान थोडे कमी झाल्याने सुखद वाटत होते. आष्टी, मारकंडा, चौडमपल्ली, बोरी इटला चेरु मार्गे रात्रो ९.३०चे सुमारास बस आलापल्ली रेंज कार्यालयासमोर येऊन उभी राहीली. नामदेवने सामान उतरवून नाक्यावरील वनरक्षकास नवीन छोटे साहेब आल्याची वर्दी त्याला दिली. हा वनरक्षक पळत श्री. नय्यर साहेब, सब डी.एफ.ओ. यांचे बंगल्यावर गेला आणि मी

आल्याचे त्यांना कळविले. त्यावेळी आलापल्लीत वीज नव्हती म्हणून नय्यर साहेब कंदिल घेऊन आले. अंधुक प्रकाशात माझेकडे पाहून म्हणाले आप हो पत्की साब ?" मी मान डोलवताच त्यांनी मला स्वःताचे बंगल्यावर नेले आणि जेवणाचे विचारु लागले. मी त्यांना थाप मारली की हमारा खाना गोंडपिंपरीमे हुआ है. त्यांनी मला पटकन सांगीतले की वहा तो सिर्फ आलूबोंडा और पकोडे मिळते है, खाना नाही. त्यांचे वय त्यावेळेस ५१-५२ वर्षे असावे. त्यांनी आपल्या पत्नीस बोलावून सूचना केल्या की पत्की साब और नामदेव खाना खायेंगे. त्या माऊलीने गरम गरम फुलके, आलूची सब्जी, आमका

आचार आम्हास प्रेमाने खाऊ घातले. परत त्या मला म्हणाल्या 'बेटा भुके नहीं रहना, तुम कभी भी आओ और खाना मांगो".

मला ही स्वागतार्ह वागणूक पाहून खूप-खूप आनंद झाला. मी त्या दोघांचेही आभार मानून निघालो. नय्यर साहेबांनी जीपने वन विश्राम गृहात पोहचविले. कल सुबह सात बजे तैयार रहना जंगले जाने के किये असे सांगून ते परत घरी गेले.

## तलवाड्याच्या जंगलातील वणवा -

पाच मिनीटात मी गाढ निद्रीस्त झालो. मध्यरात्री तीनचे सुमारास दरवाजाची कडी कोणीतरी वाजवत होते. मी नाईलाजाने व नाराजीने दरवाजा उघडला. समोर नय्यर साहेब उभे होते. तलवाडेके जंगल में अंगार लग गई है, हम सब लोगो को वहा जाना है. आपके लिये मैं गमचा, पानीकी छागलं भरके लाया हूं. घबरांना मत, मेरे पिछे रहके अंगार बुझाना है. सुमारे ७०-८० जणांची झुंड ट्रक, ट्रॅक्टर, द्वारा तलवाड्याकडे रवाना झाली. अधिपत्य नय्यर साहेब स्वःता करित होते. सुमारे दीड तासात वणवा शांत झाला. काळवंडलेले हात,चेहरा पाहून मी त्रस्त होतो.

नय्यर साहेब माझेकडे मायेने पहात होते. पाणी पिऊन शांत झाल्यावर ते म्हणाले "अंगार बुझाना वन अधिकारीका आद्य कर्तव्य होता और आप उसमे पास हो गये इसलीये अभिनंदन. आज २४ घंटा पूर्ण आराम करना और डायरीमे ऐसाही लिखना. आपको कोई अधिकारी स्पष्टीकरण नही मांगेगा".

## व्हेंडरचे दप्तर तपासणे -

महाराष्ट्र राज्याचा विदर्भ प्रदेश जुन्या मध्य प्रदेश राज्याचा भाग होता. या भागात खेडूतांना सवलतीच्या दराने किरकोळ वनउपज विकण्यासाठी विक्रेते (व्हेंडर) शासन मंजूर करित असे. असाच एक व्हेंडर आलापल्ली वन विभागाच्या लगाम वनक्षेत्रात बोरी या गावी कार्यरत होता. एके दिवशी श्री. सरवटे साहेबांनी मला या व्हेंडरचे दप्तर तपासून, अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. मला या कार्यप्रणालीची काहीच माहिती नव्हती, तरीही निमूटपणे मी चंद्रपूरहून बोरीकडे रवाना झालो. बोरी येथे एका नियतक्षेत्र वनरक्षकाचे मुख्यालय आहे. त्या वनरक्षकासोबत मी, व्हेंडरचे कार्यालयात गेलो. हे नवीन छोटे साहेब तुमचे दप्तर तपासणीसाठी आले आहेत अशी ओळख त्यांनी करून दिली. आलापल्लीचे रस्त्यावर एक लाकडी लहानसे कार्यालय होते. तेथे जेमतेम दोन खुर्चा ठेवता येतील तेवढी जागा होती. एका मोडक्या खुर्चीवर व्हेंडर बसला होता. तो उठून उभा राहीला व तीच खुर्ची मला बसण्यासाठी त्यांनी देवू केली. ही असामी सुमारे ५२-५३ वयाची होती. त्यांना हिंदी व गोंडी भाषा येत होती, मराठीचे जुजबी ज्ञान होते. मी, त्यांना कार्यप्रणालीची माहिती विचारण्यास सुरूवात केली. पहिल्या २-३ प्रश्नांवरून या चाणाक्ष व्हेंडरने ओळखले की मी अत्यंत नवखा असून, मला काहीही माहिती नाही. परंतु, चेहऱ्यावर त्याची झळक न दर्शविता त्यांनी मला कार्यप्रणालीची सविस्तर माहिती सुमारे १० मिनीटात देऊन, त्यांचेकडे असलेले दस्तावेज, विक्री चिठ्ठया, रोख रक्कम, रोखलेखा पुस्तक दाखवून, त्यांची खातरजमा करण्याची विनंती केली. मला हे सर्व ज्ञान नवीन होते. हा व्हेंडर कर्तव्यनिष्ठ व प्रामाणिक होता. विक्री कमीशन त्यांना सरासरी दरमहा रू.१५/- मिळायचे, पण स्वारी त्यात समाधानी होती. शेवटी त्यांनी मला शेरा पुस्तक समोर केले. जनतेची सेवा करणारा प्रामाणिक वनउपज विक्रेता असा शेरा मारुन, मी त्यांचे आभार मानले. अखेरीस त्यांनी मला गुळाचा कोरा चहा पाजून निरोप दिला. सरवटे साहेबांना अहवाल दिल्यानंतर, त्यांनी मला मिश्कीलपणे विचारले "कसा होता व्हेंडर व अनुभव ?"

## माझा रेंज चार्ज -

दि. ०१-१०-१९६७ ते ३१-०५-१९६८ या कालावधीत मी लगाम वनक्षेत्रात, चौडमपल्ली मुख्यालयात वास्तव्याला होतो. श्री. जे. बी. भुते या पदोन्नत वनक्षेत्रपालाकडून मी लगाम वनक्षेत्राचा कार्यभार स्वीकारला होता. श्री. भुते, विशेष कार्य वनक्षेत्रपाल म्हणून माझे मार्गदर्शनासाठी तिथेच कार्यरत होते. मी चौडमपल्लीस रुजू झाल्याचे दिवशी सायंकाळी त्यांनी शासकीय निवासस्थान खाली करून माझे स्वाधीन केले. मी, नको म्हणत असताना सुध्दा यांनी स्वेच्छेने ही कारवाई केली आणि म्हणाले "RFOको हमेशा अपने निवासथान और दप्तर में होना चाहिये" आता, बदली झाल्यानंतर वर्षानुवर्षे शासकीय निवासस्थान खाली न करता, बळजबरीने राहणारे भारतीय वन सेवेतील अधिकारी कुठे, तर श्री. भुते कुठे यांची तुलना मी करत होतो". श्री.भुते यांचे वय त्यावेळी सुमारे ५१-५२ वर्षे असावे, शिक्षण ४ थी पर्यंत, चांगल्यापैकी इंग्लीश जाणणारे,वर्णाने काळे पण मनाने शुभ्र, त्यांना मदिरेचे व्यसन होते, पण सकाळी ७ ते सायंकाळी ७ पर्यंत ते दारुस स्पर्श करित नसत. दारुचा वास दुसऱ्यास जाऊ नये या करिता ते तोंडांत नेहमी वेलची ठेवायचे. प्रॅक्टीकल वन अधिकारी, कुशाग्र बुध्दिमत्ता. कर्तव्यनिष्ठ,हाताखालील कर्मचारी यांचेशी सलोख्याचे संबंध ही त्यांची वैशिष्ट्ये होती. दररोज रोखलेखा पुस्तक वनक्षेत्रपाल यांनी स्वतः लिहीणे आवश्यक आहे हा मंत्र त्यांनी मला दिला.

## ऋषीकेश मुळगावकर -

श्री. मुळगावकर साहेब भारतीय विमान दलात एअर व्हाइस मार्शल या पदावर असताना वाघाच्या शिकारीसाठी नोव्हेंबर १९६७ मध्ये चंद्रपूर जिल्यातील चपराला येथे आले होते. येताना त्यांनी जीपला जोडून कॅराव्हान आणला होता. अत्यंत भडक माथ्याचे व्यक्ती

म्हणून त्यांचा नावलौकिक होता, मला वन विभागाचे प्रमुख श्री एस. एस. बूट साहेब यांनी अर्धशासकीय पत्र लिहून त्यांची विशेष काळजी घेण्यसाठी सूचना दिल्या होत्या. सुदैवाने त्यांची आणि माझी तार जुळली. येताना त्यांनीवि लायती मद्याच्या सात मोठ्या बाटल्या आणल्या होत्या. पहिले २-३ दिवस त्यांनी मला मद्य ऑफर केले नाही. परंतु त्यानंतर एके दिवशी त्यांनी मला विचारले " यंग म्यान घेणार का?" मी नम्रपणे त्यांना नकार देऊन गालातल्या गालात हसलो. तुझ्या हसण्यामळे तू फसलास. आता एक पेग माझाबरोबर घे असे सांगून, त्यांनी जीनचा एक पेग माझासाठी तयार केला व रात्रीचे भोजन स्वतः बरोबर करण्यास भाग पाडले. हळू-हळू आमची मैत्री वाढू लागली. त्यांना मी एक चांगला ट्रेकर दिला होता. हा ट्रेकर मला रोजची माहिती देत असे. एके दिवशी ट्रेकरने मला रिपोर्ट दिला की आज एक मोठी वाघिण समोरून गेली, परंतु ती गर्भवती असल्याचे समजल्यावर त्यांनी बंदूक खाली केली आणि वाघिणीला जावू दिले. खरा शिकारी कसा असावा याचे मूर्तीमंत उदाहरण ते होते. त्यांना एके दिवशी मी चौडमपल्ली निवासस्थानी रात्रीचे भोजनास निमंत्रित केले. माझा शिपाई नामदेव उत्तम स्वयंपाकी होता त्याने मटण, चिकन, फिश, प्रॉन्स याच्या ४-५ डिशेश तयार केल्या होत्या. भोजनावर मुळगावकर साहेब खुष झाले. त्यांनी नामदेवला रु १०० बक्षिशी दिली. मला त्यांनी ऑफर दिली की पुढील वेळी पुण्यास येताना रु.२२०० घेवून या आणि नवीन कोरी वेस्पा स्कूटर घेऊन जा.त्यावेळी नवीन वेस्पा स्कूटर मिळण्यास कमीत कमी २-३ वर्ष लागायची आणि बाजारात तिची किमत रु २७०० होती. त्या वेळी माझेकडे रु २२०० नसल्याने मी त्यांना धन्यवाद दिले आणि निरोप घेतला. पुण्यास गेल्यानंतर त्यांनी बूट साहेबाना पत्र लिहून माझी खास स्तुती केली होती.

## सिंगनपल्ली वनग्राम वासियांच्या संपर्कात -

लगाम वनक्षेत्रात ६ वनग्रामे होती. दिवाळी सण नोव्हेंबर मध्ये पार पाडल्यानंतर,एके दिवशी सकाळी,रेंज कार्यालयात, सिंगनपल्ली वनग्रामातील १०-१२ व्यक्ती मला भेटण्यासाठी बाहेर थांबल्या होत्या. कशासाठी हे आले आहेत अशी विचारणा मी, श्री. भुते यांचेकडे केली. त्यांना काम हवे आहे असे समजले. मी आणि भुते त्यांचेकडे गेलो. त्यांचा म्होरक्या मला विचारु लागला "साब छपाई कब चालू करेंगे?" छपाई म्हणजे कुपातील तोडीस योग्य झाडांचे मार्कंग करणे. मी अचंबीत झालो की या खेडूतांना ही माहिती कशी? म्होरक्याने उत्तर दिले की "साब, कुप नं.३ का डिमार्केशन हमनेही किया था. उसमें छपाई कब चालू करेंगे? "तपासाअंती ग्रामस्थांनी दिलेली माहिती बरोबर आढळली. तेंव्हा उद्याच छपाईचे काम सुरु करण्यासाठी आम्ही दोघे कुपात येत आहोत असे त्यांना सांगीतले. वनांचे शास्त्रीय ज्ञान व रोजगार यांचे केवढे नियोजन होते ग्रामस्थांचे?

## तेंदुपाने मक्तेदाराचे बाबत -

१९६९ पूर्वी तेंदुपानांचे राष्ट्रीयीकरण झाले नसल्याने, दरवर्षी तेंदुपाने घटकांची विक्री निविदा पध्दतीने होत असे. लगाम वनक्षेत्रात तीन घटक होते. त्यापैकी एक घटक श्री. महमंद शफी यांनी खरेदी केला होता. वि. व. अधिकारी यांचेशी करारनामा केल्यानंतर, मक्तेदार कार्यारंभ आदेश व कॉपीसिंगचे आदेश घेण्यासाठी प्रादेशिक वनक्षेत्रपाल कार्यालयात येत होते. त्याप्रमाणे श्री. शफी हे फेब्रुवारीचे पहिल्या आठवड्यात चौडमपल्लीस कार्यालयात आले होते. खादीचा पायजमा व सफेद खादीचा झब्बा, मुंडाशीला सफेद गमचा या पोशाखात ते आले होते. त्यांचे काम १५-२० मिनीटात पूर्ण करुन, मी त्यांना दोन्ही आदेश देऊन, पोच घेतली व शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सुमारे तासभर ते कार्यालयाचे बाहेर विनाकारण रेंगाळत होते. काही वेळाने श्री भुते त्यांना घेऊन माझेकडे आले. श्री शफी यांना तुम्हास भेटायचे आहे असे त्यांनी सांगीतले. मी दोघांनाही खुर्चीवर बसवून विचारले काय काम आहे? श्री. शफी यांनी एक लिफाफा काढून माझे टेबलावर ठेवला. काय आहे हे असे विचारता, ते म्हणाले, "साब प्रथेनुसार हम रु.१००/- सब मक्तेदार, वनक्षेत्रपाल साब लोगोको देते है, राजीखुशीसे". मी क्षणभर काही न बोलता श्री शफी यांना सांगीतले की "मुझे ये पैसा नाही नाहिये, लेकीन आपकी इच्छा और अनुमती है, तो ये पैसेसे आप स्कुलमे पढाई करनेवाले बच्चोंको खाना दिजीये ".श्री. शफी आश्चर्याने मला पाहू लागले आणि म्हणाले" ठीक है साब".

हेच महंमद शफी पुढे चंद्रपूर जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष झाले. १९७८ मध्ये मी विभागीय वन अधिकारी, दक्षिण चांदा वन विभाग असतांना जिल्हा परिषद चंद्रपूर इमारतीत बैठकीस गेलो असता, श्री. शफी यांचा एक माणूस पळत माझेकडे आला आणि म्हणाला "शफी साबने आपको बुलाया है". नाईलाजाने मी तिकडे गेलो. पहातो, तर पुष्पगुच्छ घेऊन त्यांनी माझे स्वागत केले आणि म्हणाले "साब,मैं महंमद शफी, आपका तेंदु मक्तेदार, मुझे पहचाना क्या?" ते मला बैठकीस घेऊन गेले, त्यांनी माझी ओळख सगळ्यांना करुन देत, सूचना दिल्या की,"पत्की साबके सर्व काम जल्दीसे पूरा करने के आदेश में देता हूं". जसे कर्म तसे फल.(क्रमशः)...



# माझी फोटोग्राफी -७

प्रमोद यादव, सेनि भाप्रसे

आज तारीख 27 सप्टेंबर 2025

एवरेस्ट बेस कॅम्पवर पोहोचण्यासाठी फक्त एक दिवस बाकी होता . आमचा आज मुक्काम हॉटेल न्यू एव्हरेस्ट बेस कॅम्प लोबोचे (Lobuche)येथे 16210 फुटावर होता. हवामान दिवसा जरी कमी टेंपरेचर म्हणजे 4/5 अंश असले तरी संध्याकाळी कधी कधी ते मायनस देखील होत असे . त्यामुळे ट्रेक चालू असताना अंगात उबदार कपडे घालावीच लागत असत . या ट्रेकमध्ये सर्वात महत्त्वाचे होते ते म्हणजे हातात काठी (स्टीक) ही पाहिजेच . ज्यांना सराव आहे त्यांच्या हातात नसली तरी त्यांना फारशी अडचण येत नसे. शिवाय बूट देखील ट्रेकिंगचेच असले पाहिजेत . जरी जड असले तरी चालताना पावले घसरत नाहीत .

दुसरी महत्वाची बाब म्हणजे तुम्हाला तेथील हवामानाने साथ दिली पाहिजे . ते आपल्या हातात अजिबात नाही . थोडक्यात नशिब चांगले बलबत्तर हवे . हवामानाची साथ मिळाली की ट्रेक करणे सहज शक्य होत जात असे. आज लोबोचे माउंट एवरेस्ट पासून जवळ असणारे ठिकाण होते. उद्याचा मुक्काम कॅम्प गोरखशेप (Gorak Shep) येथे होणार होता. तरी देखील या दोन्ही ठिकाणांमध्ये तीनशे मीटर उंचीचे अंतर आहे .

तेथील हवामान /वातावरणात अचानक बदल होत असे. एकदम कडक ऊन तर काही क्षणात एकदम दाट धुखे पडत असे. ऑक्सिजन पूर्णतः विरळ होत चाललेला होता. सर्वांना कफ झालेला होता. खोकला देखील सुरू झाला होता .याचा परिणाम तब्येतीवर होत होता. झोप येतच नव्हती . जेवण जात नसे. प्रत्येकाचा चेहरा निस्तेज दिसू लागला होता. मी तर नाश्ता साठी फक्त दोन उकडलेली अंडी खाल्ली . दुपारचे जेवण अजिबात होत नव्हते. हा त्रास ग्रुप मधील बहुतेक जणांना झाला होता. उकडलेली अंडी जरी मिळाली ती देखील कशीबशी पोटात ढकललेली होती. हवेवर आणि पाण्यावरच जगत होतो असे म्हणले तरी वावगे ठरणार नाही . आम्ही एवरेस्ट बेस कॅम्पला जाणार होतो ,म्हणजे माऊंट एवरेस्ट बेस कॅम्प तेथे एवढा त्रास होतो तर माऊंट एव्हरेस्ट वर जाणाऱ्या गिर्यारोहकांच्या बाबत विचारच करू शकत नाही. कारण एक तर ते एवढ्या मोठ्या अडचणीला तोंड देत शिखरावर जातात ऑक्सिजन कमी, प्रचंड वारा ,खूप थंडी, पाठीवर मोठे ओझे ,हे सगळं करावं लागतं. त्यात एवरेस्ट शिखरावर पाऊल ठेवले तर तो आनंद अविस्मरणीय क्षण असतो गिर्यारोहक साठी . त्या साठी मनाची आणि शरीराची मोठी तयारी त्यांनी केलेली असते.

आपण बेस कॅम्प पर्यंत पोचलो हेही खूप मोठ धाडस आहे. अशा धाडसी ट्रेक केला की निश्चितपणे आत्मविश्वास प्रचंड वाढलेला असतो.

आज या ठिकाणी तीन-तीन बॉटल पाण्याच्या बाटल्या विकत घेतल्या. नेपाळी चलनामध्ये एक बॉटल पाचशे रुपये किमतीला होती म्हणजे आपल्याकडील 350 रुपये. पाण्याच्या बाटलीची खरेदी केली . कारण जवळून जरी पाणी वाहत असले बर्फातून आलेले पाणी होते तरीपण ते पाणी शुद्ध होतेच याची शाश्वती नव्हती. जरी थंड पाणी असले तरी त्या पाण्यामध्ये काही बॅक्टेरिया असू शकतात. त्यामुळे ते पाणी पिणे योग्य नव्हते शिवाय ते इतके थंड असे की घशावर त्याचा नक्कीच परिणाम होत असे. गरम पाणी देखील प्यायचे झाले तरी त्याला देखील शंभर रुपये ग्लास पैसे द्यावे लागत असे. आणि गरम पाण्याची गरज शरीराला होती.

या ठिकाणी सर्वच वस्तू महाग असत. कारण वाहतूक ही संपूर्ण मानवी आणि प्राण्यांच्या मार्फत केली जाते . लोबोचे येथे पोहोचल्यानंतर बहुतेकांना आता आपण एबीसी कॅम्प नक्कीच करणार हा आत्मविश्वास आलेलाच होता. तसा तो सुरुवातीपासूनच होता. प्रत्येकाच वजन कमी होत चालल होत .जेवण जात नव्हतं आणि शरीराला तर ठीकठाक ठेवायचे होते. म्हणून आहे त्या परिस्थितीला तोंड देत आमचा ट्रेक चालू होता. आता उद्या शेवटचा दिवसचा ट्रेक करणार होतो . एवरेस्ट च्या पायथ्याला पोचणार होतो म्हणून मनाची चांगलीच तयारी झाली होती. संध्याकाळी रात्रीच्या जेवणात दोन उकडलेली अंडी खाऊन झोप लागेल म्हणून निद्रा देवीची प्रार्थना करून बेडवर आडवा झालो झोप येईल याची शाश्वती नव्हती

क्रमशः









## The most dangerous pandemic of this century

………may not be a virus.
It is the "One Child Pandemic."
One child carrying the pressure of two parents, four grandparents, and an entire bloodline's expectations.
One child growing up in silent homes instead of noisy childhoods.
No sibling fights.
No shared secrets.
No built-in best friend for life.
Just screens, perfection pressure, loneliness, and emotional isolation dressed up as "modern comfort."
Earlier generations grew up with less money but more people.
Today's generation grows up with more gadgets but fewer human bonds.
A single child becomes the family's hope, retirement plan, emotional support system, and legacy all at once.
And when that child breaks mentally, the whole house collapses quietly.
Human beings were never designed to grow up emotionally alone.
A society survives not only on economy and technology.
It survives on cousins, siblings, chaos at dinner tables, shared responsibilities, and people who stay after the parents are gone.
The real tragedy is not declining birth rates.
It is declining human connection.
We are slowly creating generations who know how to use every device...but do not know how to share grief, tolerate differences, protect relationships, or carry family together.
A crowded house was never poverty.
Sometimes, it was civilization itself

## आरोग्य साधना

शरीराचे अवयव व त्याला निष्काळजी पणामुळे होणारे आजार. (गुरूकुल योगा आश्रम संकलित)
१) पोट: केव्हा बिघाडते, जेव्हा तुम्ही सकाळी नाष्टा करत नाही....
२) मूत्रपिंड: केव्हा बिघडतात जेव्हा तुम्ही २४ तासात १० ग्लास पाणी पीत नाही......
३) पित्ताशय: केव्हा बिघडते, जेव्हा तुम्ही ११ च्या आत झोपत नाही व सूर्योदया पूर्वी उठत नाही.....
४) लहान आतडे: केव्हा बिघडते, जेव्हा तुम्ही थंड आणि शिळे अन्न खाता....
५) मोठे आतडे: केव्हा बिघडते,जेव्हा तुम्ही तळलेले आणि मसालेदार पदार्थ जास्त खाता....
६) फुफ्फुसे: केव्हा बिघडतात, जेव्हा तुम्ही धूर,धूळ आणि सिगारेट बिडी ने प्रदूषित वातावरणात श्वास घेता.....
७) यकृत: केव्हा बिघडते, जेव्हा तुम्ही तळलेले, जंक आणि फास्ट फूड खाता......
८) हृदय: केव्हा बिघडते, जेव्हा तुम्ही  जास्त मीठ मिश्रित व चरबीयुक्त तसेच रिफाइंड तेल अशा प्रकारचा आहार घेता....
९) स्वादुपिंड: केव्हा बिघडते, जेव्हा तुम्ही सहज मिळतात आणि चविष्ट लागतात म्हणून जास्त गोड पदार्थ खाता......
१०) "डोळे":  केव्हा बिघडतात, जेव्हा तुम्ही अंधारात मोबाईल व कॉम्प्युटर वर काम करता....
११) "मेंदू": केव्हा बिघडतो, जेव्हा तुम्ही नकारात्मक विचार करता....
निसर्गाने "मोफत" मध्ये दिलेल्या शरीराच्या "अवयवाची" योग्य "काळजी" घ्या योग प्राणायाम करा  शरीर "स्वस्थ" तरच आपण "मस्त" "शरीराचे" कोणते ही"अवयव" हे बाजारा मध्ये मिळत नाहीत आणि चुकून मिळाले तरी खूप महाग आणि आपल्या शरीरात योग्य पद्धतीने सुट होऊन बसतीलच असे नाही म्हणून आपल्या "शरीरातील अवयवांची" नेहमी काळजी घ्या.

तुम्हीच आहात तुमच्या शरिराचे खरे राखणदार. वयाच्या ५५ वर्षापुढील सर्वांनी खालील दहा कृती टाळाव्यात:

१.  जीने चढू नका, गरजच असेल तर FCआधाराच्या पाईपला घट्ट धरून चालावे.
२.  आपले डोके गतीने फिरवू नका, आधी आपले पूर्ण शरीर वॉर्मअप करा.
३.  आपले शरीर वाकवून पायांना स्पर्श करण्याचा प्रयत्न करू नका आधी पूर्ण शरीर वॉर्मअप करा.
४. आपला पायजमा उभ्याने  न घालता बसून घाला.
५.  झोपेतून उठताना तोंड समोर ठेऊन उठू नका तर डाव्या अगर उजव्या कुशीवर वळून उठा.
६. उलटे चालू नका त्याने गंभीर इजा होऊ शकते.
७.  खाली वाकून जड वस्तू उचलू नका तर आधी गुडघ्यात वाकून मग उचला.
८.  झोपेतून उठताना जलद न उठता प्रथम काही मिनिटे शांत बसून मग उठा.
९.  संडासला जोर लावू नका नैसर्गिक होऊ द्या.

अजून महत्त्वाचे नेहमी कृतिशील रहा व सकारात्मक विचार ठेवा कारण आयुष्यभर काबाडकष्ट केल्यानंतर आता खरे जीवन आनंदी जगण्याची वेळ आहे.

● वरचेवर मित्रांच्या संपर्कात जरूर रहा मनसोक्त पैसे, वेळ खर्च करा

● आयुष्य मर्यादित आहे आणि जीवनाचा जेंव्हा शेवट होईल, तेंव्हा इथली कोणतीच गोष्ट आपल्या सोबत नेता येणार नाही.

● मग जीवनात खुप काटकसर कशासाठी करायची? आवश्यक आहे तो खर्च केलाच पाहिजे ज्या गोष्टींतुन आपणास आनंद मिळतो त्या गोष्टी केल्याच पाहिजेत.

● आपण गेल्यानंतर पुढे काय होणार याची मुळीच चिंता करु नका. कारण आपला देह जेंव्हा मातीत मिसळून जाईल तेंव्हा कुणी आपले कौतुक केले काय किंवा टीका केली काय ?

● जीवनाचा आणि स्वकष्टाने मिळवलेल्या पैशांचा आनंद घेण्याची वेळ निघून गेलेली असेल ...!

● तुमच्या मुलांची खुप काळजी करु नका. त्यांना स्वतःचा मार्ग निवडू द्या. स्वतःचे भविष्य घडवू द्या. त्यांच्या ईच्छा आकांक्षाचे आणि स्वप्नांचे तुम्ही गुलाम होऊ नका .

● मुलांवर प्रेम करा त्यांची काळजी घ्या, त्यांना भेटवस्तुही द्या. मात्र काही खर्च स्वतःवर स्वतःच्या आवडी निवडीवर करा

● जन्मापासून मृत्युपर्यंत नूसते राबराब राबणे म्हणजे आयुष्य नाही हे देखील लक्षात ठेवा

● आपल्या आरोग्याची हेळसांड करुन पैसे कमवण्याचे दिवस आता संपले आहेत. पुढील काळात पैसे मोजून सुद्धा चांगले आरोग्य मिळणार नाही .

● या वयात प्रत्येकापुढे दोन महत्त्वाचे प्रश्न असतात. पैसा कमवणे कधी थांबवायचे आणि किती पैसा आपल्याला पुरेल.

● तुमच्याकडे कितीही एकर सुपीक शेतजमीन असली तरी तुम्हाला दररोज किती अन्नधान्य लागते?
तुमच्याकडे अनेक घरे असली तरी रात्री झोपण्यासाठी एक खोली पुरेशी असते !

● एक दिवस आनंदा शिवाय गेला तर आयुष्यातला एक दिवस तुम्ही गमावला आहात एक दिवस आनंदात गेला तर आयुष्यातला एक दिवस तुम्ही कमावला आहात हे लक्षात असू द्या.

● आणखी एक गोष्ट तुमचा स्वभाव खेळकर उमदा असेल तर तुम्ही आजारातून बरे व्हाल आणि तुम्ही कायम प्रफुल्लीत असाल तर तुम्ही आजारी पडणारच नाहीत.

● सगळ्यात महत्वाचे म्हणजे आजूबाजूला जे जे उत्तम आहे, उदात्त आहे त्याकडे पहा. त्याची जपणूक करा

● आणी हो, तुमच्या मित्रांना कधीही विसरु नका त्यांना जपा, हे जर तुम्हाला जमले तर तुम्ही मनाने कायम तरुण रहाल आणी इतरांनाही हवे हवेसे वाटाल.

● मित्र नसतील तर, तुम्ही नक्कीच एकटे आणी एकाकी पडाल.

● त्यासाठी रोज व्हाट्सएपच्या माध्यमातून संपर्कात रहा हसा, हसवत रहा मुक्त दाद द्या.

म्हणूनच म्हणतो आयुष्य खुप कमी आहे ते आनंदाने जगा.

● प्रेम मधुर आहे त्याची चव चाखा..!

● क्रोध घातक आहे त्याला गाडून टाका..!

● संकटे ही क्षणभंगुर आहेत, त्यांचा सामना करा..!

● डोंगरा आड गेलेला सूर्य परत दिसू शकतो पण...

● काळाच्या पडद्या आड गेलेले "जीवलग" परत कधीच दिसत नाहीत....

पंचाक्षरी कविता
पाय जपावा, वळण्याआधी
तोल जपावा, ढळण्याआधी
अन्न जपावे, विटण्याआधी

## रिटायर्ड माणूस बिचारा काय करेल ....?

वाह रे ! रिटायर माणूस !
बोलणे ऐकण्याशिवाय दुसरा पर्याय आहे का? मग, घ्या आनंद बोलण्याचा

😳 रिटायर माणूस जर उशिरा पर्यंत झोपला तर ....
बायको :आता ऊठा तरी ! तुमच्यासारखे कोणी झोपते का ? रिटायर झाले तर दुपारपर्यंत झोपून राहाल का....!

😳 रिटायर माणूस जर लवकर उठत असेल तर....?
बायको:तुम्हाला तर म्हातारपणात झोप येत नाही, दुसऱ्यांना तर झोपू द्या. एक दिवस कोणाला सुखानं झोपू देत नाही, ५वाजताच उठून बडबड करत बसता, आता तरी चुपचाप झोपा आणि इतरांना ही झोपू द्या.

## वाचक प्रतिक्रिया -सेवक वार्ता, मे-२०२६

आमचा मासिक पेपर श्रीमान गवळी सर संपादित करतात. त्यात श्री डी. बी.पाटील वन पाल यांचे क्रिकेट नैपुण्य बद्दल वृतांकन छापून आले आहे.हे वार्तांकन पेपर महाराष्ट्रातील सेवा निवृत्त वरिष्ठ ते कनिष्ठ सर्व पदांवर राहिलेले वनअधिकारी वाचतात. गवळी सरांना खूप धन्यवाद- **जे. ए. पाटील**

अतिशय सुंदर आहे. अभिनंदन!!!! Reproducing Patki sir's Bio is a very good idea **- सलीम**

## तुम्हाला माहित आहे का की

- मधाचा एक चमचा एखाद्या व्यक्तीला २४ तास जिवंत ठेवण्यासाठी पुरेसा असतो?
- जगातील पहिल्या नाण्यांपैकी एकावर मधमाशीचे चिन्ह होते?
- मधात जिवंत एंजाइम असतात?
- मध धातूच्या चमच्याच्या संपर्कात आल्यावर हे एंजाइम मरतात?
- मध खाण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे लाकडी चमचा; जर तुम्हाला तो सापडत नसेल तर प्लास्टिकचा चमचा वापरा.
- मधात एक पदार्थ असतो जो मेंदूला चांगले कार्य करण्यास मदत करतो?
- मध हा पृथ्वीवरील अशा काही पदार्थांपैकी एक आहे जो स्वतःहून मानवी जीवन टिकवू शकतो?

❖ मधमाश्यांनी आफ्रिकेतील लोकांना उपासमारीपासून वाचवले?
❖ मधमाश्यांद्वारे उत्पादित होणारे प्रोपोलिस हे सर्वात शक्तिशाली नैसर्गिक प्रतिजैविकांपैकी एक आहे?
❖ मधाची कालबाह्यता तारीख नसते?
❖ जगातील महान सम्राटांचे मृतदेह सोनेरी शवपेट्यांमध्ये पुरले जात होते आणि नंतर कुजण्यापासून रोखण्यासाठी मधाने झाकले जात होते?
❖ "हनिमून" हा शब्द लग्नानंतर प्रजनन क्षमता वाढवण्यासाठी नवविवाहित जोडप्याच्या मध सेवन करण्याच्या परंपरेतून आला आहे?
❖ तुम्हाला माहित आहे का की मधमाशी ४० दिवसांपेक्षा कमी काळ जगते, किमान १००० फुलांना भेट देते आणि एक चमचेपेक्षा कमी मध तयार करते, परंतु मधमाशीसाठी, ते संपूर्ण आयुष्यभराचे काम आहे?
❖ धन्यवाद, मौल्यवान °मधमाशी°..!

## नवीन सदस्य

१. श्री शंकर गुरनुले, सेनि.वनपाल, चंद्रपुर, मो. 9422912991
२. श्री बंडु मानापुरे, सेनि.वनपाल, एटापल्ली, मो.7756051495.
३. श्री एल.एम. शेख. सेनि.वनपाल,सिरोंचा मो.9403433976.
वरील सर्व सेवा निवृत्त वन कर्मचारी यांनी चंद्रपूर शाखेत आजीवन सभासद फी भरुन सेवक संघाचे सदस्यत्व स्विकारले आहे.
त्यांचे सेवक संघ परिवारात सहर्ष स्वागत.

## *निधन वार्ता*

सचिन नानासाहेब शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव), कन्नड गौताळा अभयारण्य, छत्रपती संभाजी नगर (वन्यजीव) विभाग यांचे दि. १ जून रोजी दुखद निधन झाले. त्यांचा अंत्यविधी मौजे रोहीला (बोलठाण) तालुका नांदगाव जि. नाशिक येथे दिनांक 2 जून मंगळवार रोजी करण्यात आला. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो हीच प्रार्थना. सेवक परिवार त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे.




एस. एस. एन. राव, सेनि विवअ यांचे दि. १३ जून रोजी चंद्रपूर येथे वयाच्या ९० व्या वर्षी दुःखद निधन झाले. दि. १४ जून रोजी सकाळी ११ वाजता त्यांचेवर शांतिधाम, चंद्रपूर येथे अंतिम संस्कार करणेत आले. त्यावळी त्यांची मुले उपस्थित होती. श्री. राव यांचे अंत्यविधी वेळी त्यांना सेवक संघाकडून पुष्पचक्र अर्पण करुन श्रध्दांजली वाहिली. सेवक संघाकडून सर्वश्री विजय खनके, शंकर पंधरे, घनश्याम मेश्राम व पुंडलिक उरकुडे हे अंत्यविधीस हजर होते.



सुरेश ईश्वरलाल सरोदे, सेवानिवृत्त मुख्य लेखापाल, यावल विभाग, जळगाव यांचे दि. १४ जून रोजी अल्पशा आजारामुळे दुःखद निधन झाले.ते कर्तव्यनिष्ठ, शिस्तप्रिय, सुरेख फायलिंग ठेवणारे,नेमून दिलेले काम वेळेत निष्ठेने पूर्ण करणारे, कार्यालयात सर्वात अगोदर येणारे व सुटीचे दिवशी सुद्धा आपले कर्तव्य बजावणारे कर्मचारी होते.
वरील सर्व मृतात्म्यांना सेवक संघ परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

## आठवणी......







केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी
कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६